# कापुरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९७८ /२०२५ दि.१४/०८/२०२५

## —: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

**ज्याअर्थी,** कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीमध्ये दिनांक १६/०८/२०२५ रोजी **इस्कॉन मंदिर** पिरामल वैकुंठ जुना मुंबई आग्रा रोड, राम मारूती नगर बाळकुम नाका या ठिकाणी **श्रीकृष्ण जन्माष्टमी** उत्सव साजरा करण्यात येणार आहे. सदर उत्सवाकरिता दिनांक १५/०८/२०२८ रोजी पासुन ४० ते ५० हजार भाविक येणार आहेत. तसेच सदर कार्यक्रमाकरिता मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई व इतर राजकीय मान्यवर तसेच उच्च पदस्थ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१)(अ)(ब)अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:—

**प्रवेश बंद —** १) कोलशेत रोड वरून कल्पतरू पार्क लगतचे राम मारूती रोड मार्गे बाळकूमकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कल्पतरू पार्क प्रवेशद्वाराचे लगत रस्ता** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर मार्गावरून जाणारी वाहने ढोकाळी नाका मार्गे इच्छित स्थळी जातील

**प्रवेश बंद —** २) पिरामल वैकुंठ बाळकुम गेट नंबर ०१ चे समोरून राम मारूती रोड मार्गे कोलशेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दादलानी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदरची वाहने दोस्ती वेस्ट कौन्टी गेट येथे डावे बाजूस वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** ३) कोलशेत गाव येथून पाईप लाईन मार्गे तसेच कोलशेत गावाकडून दोस्ती वेस्ट कौंटी गेट मधून बाहेर पडून उजवीकडे वळण घेवून सर्व्हीस रोडने बाळकूम नाक्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दोस्ती वेस्ट कौंटी गेटचे** समोर **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदरची वाहने कोलशेत रोडने लोढा आमारा मार्गे इच्छित स्थळी जातील

**प्रवेश बंद —** ४) यशस्वीनगर पाईप लाईन मार्गे तसेच हायलॅन्ड चौकाकडून पिरामल वैकुंठ बाळकूम गेट नं. ०२ समोरून बाळकुमकडे अथवा कोलशेतकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **राधाकृ ण स्वीट समोरील चौक** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सरदची वाहने यशस्वीनगर मार्गे अथवा हायलॅन्ड चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** ५) साकेतकडून बाळकूमनाका मार्गे राम मारूती रोडने कोलशेत कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बाळकूम नाका** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर मार्गावरून जाणारी वाहने बाळकुम नाका येथून डावे बाजूस वळण घेवून माजिवाडा प्रभाग समिती सिग्नल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** ६) भिवंडीकडून दादलानी चौक मार्गे उजवे बाजूस वळण घेवून राम मारूती रोडने कोलशेतकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दादलानी चौक** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** सदर मार्गावरून जाणारी वाहने बाळकूम नाका मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**सदरची वाहतूक अधिसूचना दिनांक १५/०८/२०२५ रोजी सकाळी ०७:०० ते दिनांक १६/०८/२०२५ रोजी २३.०० वाजेपर्यंत अंमलात राहील.**

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीकरीता :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, वागळे व पो.निरी. कापुरबावडी वाहतूक उप विभाग.

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी.